क्र.प्रा.वि/आयसीडी/2015-16/३८९
दि. १९ ऑक्टोबर, २०१५

मसुदा
क्र. ४/२०१५-१६

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार, ***दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी सायंकाळी*** ४.३० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२, येथे सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. संजय देशमुख (कुलगुरू)
२. प्राचार्य (डॉ.) सुरेश किसनराव उकरंडे
३. प्राचार्य (डॉ.) दत्ताजीराव यशवंतराव पाटील
४. प्राचार्य (डॉ.) गोरक्ष विठ्ठलराव पारगांवकर
५. डॉ. बाळकृष्ण विठ्ठल भोसले
६. डॉ. (श्रीमती) आरती प्रसाद
७. श्री. महादेव बाबुराव जगताप
८. प्राचार्य (डॉ.) अशोक पाडुरंग महाजन
९. प्राचार्य (डॉ.) विजय भालचंद्र जोशी
१०. प्राचार्य (डॉ.) सिध्देश्वर तुकाराम गडदे
११. श्री. संजय बाबुराव शेटे

श्री. अ.आ. फळणीकर, वित्त व लेखा अधिकारी आणि श्री. दिपक वसावे, प्रभारी परीक्षा नियंत्रक हे कायम निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

सभेला सुरूवात करताना मा. कुलगुरूंनी सांगितले की प्रा. (डॉ.) गुरूनाथ पंडित यांनी कळविले आहे की, ते या सभेस उपस्थित राहू शकणार नसल्याने त्यांना या सभेत अनुपस्थित राहण्यास परवानगी द्यावी अशी त्यांनी विनंती केली.

यावर व्यवस्थापन परिषदेने डॉ. गुरूनाथ पंडित यांची या सभेस अनुपस्थित राहण्याची विनंती मान्य केली.

➢ **श्रध्दांजली –**

**माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम**

मुलांचे लाडके 'कलामचाचा', 'मिसाईल मॅन' अशी ख्याती असलेले शास्त्रज्ञ आणि लोकप्रिय माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे हृदयविकाराने दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

**श्री. भालचंद्र ऊर्फे अण्णा पेंढारकर**

संगीत रंगभूमीचा चालताबोलता इतिहास असलेले मराठी रंगभूमीवरील अष्टपैलू व्यक्तिमत्व श्री. भालचंद्र पेंढारकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रध्दांजली वाहण्यात आली.

➢ **मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. संजय देशमुख यांची आणि** श्री. दिपक वसावे, यांची प्रभारी परीक्षा नियंत्रक म्हणून नियुक्ती केल्याबदल व्यवस्थापन परिषदेने त्यांचे स्वागत केले.

Item 7 : Post facto permission to adopt a logo for autonomous Department.

Resolution : *Resolved* that Post facto permission to adopt a logo for autonomous Department. be not accepted.

पुढे असाही ठराव करण्यात आली की, जे विद्यापीठा अंतर्गत येणारे विभाग आहेत त्यांनी मुंबई विद्यापीठाचा लोगो वापरावा त्यांच्या विभागाचा स्वतंत्र लोगो तयार करू नये.

बाब १२: विद्वत परिषदेने दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ च्या सभेत खालील बाबींवरकेलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेने दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ च्या सभेत २.१, २.२, २.३, ३.११, ३.१७, ४.४, ४.५, ४.८, ४.१०, ४.१३, ४.१४, ४.१५, ४.१९, ४.२२, ४.२४, ४.२६, ४.२८, ४.२९, ४.३१, ४.३२, ४.३३, ५.१, ६.१, ७.१, ७.४, ८.१, ९.३, ९.४, ९.५, ४.२६ (AC 29/5/2015) ४.२१ (26/6/2015) केलेल्या शिफारशींना मान्यता देण्यात आली.

मान्यतेसाठी

कुलगुरू

- 5 NOV 2015

कुलसचिव

स्थानापन्न उपकुलसचिव
(का.प्रा.वि.)

➢ मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. संजय देशमुख यांची आणि श्री. दिपक वसावे, यांची प्रभारी परीक्षा नियंत्रक म्हणून नियुक्ती केल्याबदल व्यवस्थापन परिषदेने त्यांचे स्वागत केले.

बाब १: वित्त व लेखा समितीच्या दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीच्या दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास खालील सुधारणांसह मान्यता देण्यात आली.

बाब क्र. १६ मधील मुद्दा क्र. ४, ५ वर चर्चा करत असताना सखोल चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्या विविध विभागातील समन्वयक, ठाणे उपकेंद्र वगळून ज्यांच्याकडे समन्वयक पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे त्यांचे मानधन रू.१०,०००/- करण्यात यावे.

श्री. महादेव जगताप यांनी याच्यावर डिसेंट नोंदविला.

बाब क्र. १३ व १७ वर चर्चा करत असताना सखोल चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, बायोटेक्नॉलॉजी विभागातील प्राध्यपकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत असा ठराव करण्यात आला की, विभागांचे निमंत्रित अध्यापकांचे (Visiting faculties) मानधन रू.३००/- ऐवजी रू.५००/- करण्यात यावे.

बाब २: मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी येथील औद्योगिक क्षेत्र भूखंड क्र. पी ६१ मधून पाईप लाईन व रस्ता यासाठी जागा देणेबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी येथील औद्योगिक क्षेत्र भूखंड क्र. पी ६१ मधून पाईप लाईन व रस्ता त्या भूखंडाच्या बाहेरून जाईल याचा प्रयत्न करावा, तसेच नकाशाचा अभ्यास करून योग्य तो निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आला.

बाब ३: सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क. २९.- महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणूका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीकरीता.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क. २९.- महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणूका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियमांची नोंद घेण्यात आली.

तसेच सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क. २९.- महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणूका तात्पुरत्या पुढे ढकलण्यात आल्यामुळे व नवीन कायदयाच्या मसुदाचा अभ्यास करून सुचना मागवून त्यावर चर्चा विनिमय करण्यासाठी व्यवस्थापन परिषद, विद्वत परिषद व अधिसभेच्या सदस्यांची व मा. कुलगुरू यांची संयुक्त बैठक दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी होणार असल्याचे मा. कुलगुरूंनी जाहिर केले.

बाब ४: सन २०१५-२०१६ वर्षाच्या लेख्यांचे लेखापरिक्षण करण्यासाठी सांविधानिक लेखा परिक्षकाची (Statutory Auditor) नियुक्ती करण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, सन २०१५-२०१६ वर्षाकरीता मे. शरद एस. गायकवाड, सनदी लेखापाल यांची सांविधानिक लेखापरिक्षकाची (Statutory Auditor) म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

बाब ५: सन २०१४-२०१५ मध्ये विद्यापीठाला प्राप्त झालेल्या एकुण रू.२,२९,१८,४५४/- देणग्यांच्या २५ % समान हिस्सा रू.५७,२९,६१३/- विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळविण्यासाठीचा प्रस्ताव पाठविण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, सन २०१४-२०१५ मध्ये विद्यापीठाला प्राप्त झालेल्या एकुण रू.२,२९,१८,४५४/- देणग्यांच्या २५% समान हिस्सा रू.५७,२९,६१३/- विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळविण्यासाठीचा प्रस्ताव पाठविण्याची मान्यता देण्यात आली.

बाब ६: महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ७८ (सी) नुसार दोन विषय तज्ञ निवडसमितीवर नामनिर्देशित करण्यासाठी.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ७८ (सी) नुसार दोन विषय तज्ञ निवडसमितीवर नामनिर्देशित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले.

Item 7 : Post facto permission to adopt a logo for autonomous Department.

Resolution : *Resolved* that Post facto permission to adopt a logo for autonomous Department. be not accepted.

पुढे असाही ठराव करण्यात आली की, जे विद्यापीठा अंतर्गत येणारे विभाग आहेत त्यांनी मुंबई विद्यापीठाचा लोगो वापरावा त्यांच्या विभागाचा स्वतंत्र लोगो तयार करू नये.

Item 8 : Post facto permission to open an account for University Department of Physics (Autonomous).

Resolution : *Resolved* that Post facto permission to open an account for University Department of Physics (Autonomous) be accepted.

Item 9 : The proposal received from the Principal, Bhartiya Vidya Bhavan's Sardar Patel College of Engineering, Mumbai for extension of autonomous status from the academic year 2015-16.

Resolution : *Resolved* that the proposal received from the Principal, Bhartiya Vidya Bhavan's Sardar Patel College of Engineering, Mumbai for extension of autonomous status from the academic year 2015-16 be accepted.

बाब १०: शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून नविन महाविद्यालय सुरू करण्यासाठी शासनाकडे सादर केलेले प्रस्ताव परत करण्याबाबत व त्या अनुषंगाने महाविद्यालयांनी/संस्थांनी प्रस्तावासाठी भरलेले शुल्क विद्यापीठ नियमानुसार परत करणेबाबत. सदर बाब व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ व मान्यतेकरिता सादर.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून नविन महाविद्यालय सुरू करण्यासाठी शासनाकडे सादर केलेले प्रस्ताव परत करण्याबाबत व त्या अनुषंगाने महाविद्यालयांनी/संस्थांनी प्रस्तावासाठी भरलेले शुल्क विद्यापीठ नियमानुसार परत करण्यास मान्यता देण्यात आली.

बाब ११: वित्त व लेखा समितीच्या दिनांक २९ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीच्या दिनांक २९ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले.

बाब १२: विद्वत परिषदेने दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ च्या सभेत खालील बाबींवरकेलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेने दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ च्या सभेत २.१, २.२, २.३, ३.११, ३.१७, ४.४, ४.५, ४.८, ४.१०, ४.१३, ४.१४, ४.१५, ४.१९, ४.२२, ४.२४, ४.२६, ४.२८, ४.२९, ४.३१, ४.३२, ४.३३, ५.१, ६.१, ७.१, ७.४, ८.१, ८.२, ९.३, ९.४, ९.५, ९.१०, ४.२६ (AC 29/5/2015) ४.२१ (26/6/2015) केलेल्या शिफारशींना मान्यता देण्यात आली.

बाब १३: संगीत सहायक यांना उन्हाळा, दिवाळी व नाताळ सुटटया (vacations) नियुक्तीच्या दिनांकापासून मिळण्याबाबत व त्यांची नोंद सेवा पुस्तकात करण्याबाबतचा प्रस्ताव.

ठराव : मुंबई विद्यापीठातील संगीत सहायक या पदांच्या सेवाशर्ती बाबत असलेला मुदद्ा विचारात घेऊन चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्रातील इतर विद्यापीठात संगीत सहायक पदाबाबत असलेल्या सेवाशर्तीची माहिती घेऊन सदर बाब कुलगुरूंना पाठविण्यात यावी व त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले.

चर्चे दरम्यान आलेले मुददे

सुधारित परीक्षा फी व परीक्षा कामासंबधीच्या मानधनाबाबत परिपत्रक परीक्षा नियत्रंकानी लवकरात लवकर काढून त्याची अंमलबजावणी यावर्षीपासून त्वरित सुरू करावी.

परीक्षा भवनातील जुन्या परिपत्रकाचा अभ्यास करून त्याच्यामध्ये सुधारणा/बदल करण्यासाठी पाच सदस्यिय समिती खालील प्रमाणे गठित करण्यात आली.

१. श्री. दिपक वसावे - कन्वेनर
२. प्राचार्य (डॉ.) सिध्देश्वर तुकाराम गडदे - अध्यक्ष
३. प्राचार्य (डॉ.) विजय भालचंद्र जोशी - सदस्य
४.
५.

दोन सदस्य विद्यापीठ विभागातून नामनिर्देशीत **करण्याचे अधिकार** मा. कुलगुरूंना देण्यात आले.

एमएमएसच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१४ - २०१५ या वर्षामध्ये शिकवणी शुल्क वाटा (share of tuition fee) साठी जे परिपत्रक काढण्यात आले त्यास विद्वत परिषद आणि व्यवस्थापन परिषदेने यापूर्वीच मान्यता दिलेली आहे. परंतु हे परिपत्रक सन २०११- २०१२ पासुन लागू करण्याबाबत संभ्रम निर्माण झाल्यामुळे सन २०११-२०१२ पासुन शिकवणी शुल्क वाटा (share of tuition fee) ची थकबाकी वसूली करण्यासाठी महाविद्यालयांना सक्ती करू नये.

कुलगुरू